ताराई शिक्षण संस्था, पैठण संचलित

# ताराई कला व विज्ञान महाविद्यालय पैठण

ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर.

दूरध्वनी : (०२४३१)-२२४१२४









## माहिती पुस्तिका
## २०२५ - २०२६

Website : www.taraicollege.org

email: taraicollege@yahoo.com, taraisspaithan@gmail.com



# तराई शिक्षण संस्था पैठण

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अनिल त्रिंबकदासजी पटेल | अध्यक्ष |
| २) | श्री.सुभाष त्रिंबकदासजी पटेल | उपाध्यक्ष |
| ३) | प्रा.डॉ.रंजना महेंद्र पाटीदार | सचिव |
| ४) | श्री.रितेश शरद पटेल | कोषाध्यक्ष |
| ५) | श्री.महेंद्र राधाकिसन पाटीदार | सदस्य |
| ६) | सौ.कंचन अनिल पटेल | सदस्य |
| ७) | श्री.निमेश अनिल पटेल | सदस्य |
| ८) | सौ.माधुरी पियुष पटेल | सदस्य |
| ९) | सौ.विप्रा निमेश पटेल | सदस्य |

तराई शिक्षण संस्था पैठण संचलित


- तराई कला व विज्ञान महाविद्यालय, पैठण
- तराई कला, वाणिज्य व विज्ञान क.महा., पैठण
- त्रिंबकदासजी पटेल कनिष्ठ महाविद्यालय, थेरगाव
- एस.पी.बाकलीवाल विद्यालय, थेरगाव

## विशेष प्राधान्य

* अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य व शिष्यवृत्तीची सुविधा.
* विद्यार्थिनींसाठी प्रवेशास प्रथम प्राधान्य व प्रवेश शुल्कात सवलत.
* गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी स्व.वसंतराव काळे स्वाभिमान योजना (कमवा व शिका)
* महाविद्यालयातील नियमीत विद्यार्थ्यांसाठी मोफत इंग्लीश स्पिकींग कोर्स.

# ताराई शिक्षण संस्था पैठण

आमचे श्रध्दास्थान



स्व.त्रिंबकदासजी पटेल

आमचे श्रध्दास्थान



स्व.ताराबेन त्रिंबकदासजी पटेल

आमचे प्रेरणास्थान



## मा.श्री.अनिल पटेल

माजी अर्थ व नियोजन राज्यमंत्री
तथा संस्थापक अध्यक्ष
ताराई शिक्षण संस्था पैठण

## ✻ व्हिजन ✻

"तेजोमय प्रकाशासारखे ज्ञानाने फुलवू या.. " हे ब्रीदवाक्य घेऊन पैठण या ग्रामीण भागातील महाविद्यालय असून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाशी संलग्न आहे. उच्च शिक्षणासह सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक तसेच पर्यावरणीय नवनवीन आव्हानांना समर्थपणे पेलण्यास आमच्या विद्यार्थ्यांना सक्षम करणे तसेच त्यांचा सर्वांगीण विकास, स्वावलंबी पिढी बरोबरच जगाचे उज्वल भविष्य घडविण्यास त्यांचे सक्रिय व अमूल्य योगदान असावे, यासाठी कार्यरत आहे.

## ✻ मिशन ✻

आमच्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य आणि सर्वांगीण विकासासह त्यांचे व्यक्तीमत्व घडविण्यासाठी आम्ही सदैव सकारात्मक प्रयत्न करतो. अभ्यासक्रम, अध्यापनाची सृजनात्मक ध्येय आणि त्या संबंधित सेवांच्या माध्यमातून आमच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत, व्यावसायिक आणि सामाजिक भुमिकेत आवश्यक ती सर्व शाश्वत जीवनमूल्ये रुजवणे आणि वाढवण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**NOT ME BUT YOU**

**कार्यक्रमाधिकारी – डॉ.गणेश शिंदे, डॉ.रामेश्वर म्हस्के, प्रा.सुनिता पाठक**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीवा निर्माण करणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास घडवून आणणे या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून महाविद्यालयात रा.से.योजना विभाग कार्यरत आहे. या विभागात प्रती वर्षी ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. सहभागी स्वयंसेवकांना शैक्षणिक वर्षात १२० तास समाजसेवेचे काम व वर्षातून एकदा सात दिवसांच्या विशेष निवासी शिबीरात सहभाग घ्यावा लागतो. या योजनेत दोन वर्षे सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र व विद्यापीठाकडून अतिरिक्त १० बोनस गुण तृतीय वर्षात देण्यात येतात. या योजनेत सहभागी स्वयंसेवकांना जिल्हा, विभागीय, राज्य, देश पातळीवर होणाऱ्या विविध शिबीरांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली जाते.

## उन्नत भारत अभियान
## UNNAT BHARAT ABHIYAN

**सभी को मिलाकर गांवो के विकास के लिए**

Convergence of Knowledge / Experience / Resources for Rural Development



Organic Farming



Waste Management



Artisans, Industries and Livelihood



Basic Amenities



Sustainable Energy

1. Pusegaon 2. Akhatwada 3. Diyanatpur 4. Pachalgaon 5. Kapuswadi

**स्वागत....**

प्रिय विद्यार्थी मित्र / मैत्रिणींनो

विद्यार्थी मित्रहो, १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन! आपण महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करत आहात म्हणून आपले मन:पूर्वक स्वागत.....!

ताराई शिक्षण संस्थेचा ज्ञानरुपी 'यत्न' सन २००० साली थेरगाव सारख्या लहानश्या गावात सुरु झाला. उत्तम प्रतीचे शिक्षण व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हाच ध्यास घेऊन प्रथम माध्यमिक शाळेपासून सुरु झालेली परंपरा पुढे २००४ साली कला व २०१० साली विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, २००८ साली अध्यापक विद्यालय आणि याच यशाच्या बळावर उच्च शिक्षणात ताराई कला व विज्ञान वरीष्ठ महाविद्यालय, २०२४ साली कनिष्ठ महाविद्यालय, पैठणच्या रुपाने पुढे सुरु आहे.

पदापर्णातच महाविद्यालयाने यशस्वीतेच्या दिशेने वाटचाल केली. महाविद्यालयाचा गेल्या वर्षात उत्कृष्ट निकाल लागला. याचा मनोमन आनंद वाटतो. गेल्या अनेक वर्षात महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक स्पर्धात्मक परीक्षेविषयी मार्गदर्शन पर चर्चासत्र, विविध प्रकारच्या स्पर्धा, शैक्षणिक सहलीचे आयोजन, सामाजिक ऋणानुबंध जाणून खुले जिल्हा कारागृहात रक्षाबंधन कार्यक्रम, गणेश उत्सवात संपूर्ण शहरात 'पर्यावरण बचाव मोहीम', स्त्रीभ्रूण हत्येसारख्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चासत्राचे आयोजन करुन जनजागृती मोहीम, केरळ पुरग्रस्त निधी संकलन, व्यवसाय मार्गदर्शन चर्चासत्र, रस्ता सुरक्षा अभियान, रा.से.योजना शिबीर,व्यवसाय मार्गदर्शन शिबीर,वृक्षारोपनातून पर्यावरण संवर्धन, गोदावरी स्वच्छता मोहीम, लॉकडाऊन काळात गोर-गरीबांना अन्नदान, क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर झेप, आव्हान व प्रेरणा राज्यस्तरीय शिबीरात महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग आदी उपक्रम राबवण्यात आले. या बरोबरच स्पर्धात्मक युगाचे महत्त्व लक्षात घेता आम्ही महाविद्यालयात कला शाखेत **लोकप्रशासन** व विज्ञान शाखेत **सुक्ष्मजीवशास्त्र (मायक्रोबायोलॉजी)** हे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहेत.

महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास नेहमीच तत्पर आहे. महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके तसेच विविध विषयावरची वाचनीय पुस्तके उपलब्ध आहेत. सुसज्ज प्रयोगशाळा व इंटरनेट सुविधेसह संगणक संच उपलब्ध आहेत. महाविद्यालयासाठी भव्य क्रिडांगण उपलब्ध असून सर्व खेळाचे साहीत्य विद्यार्थ्यांना पुरविले जातात. महाविद्यालयाचा कारभार विद्यार्थी केंद्रभूत ठरवूनच केला जातो. विद्यार्थ्यांचे हित, उज्वल भविष्य, विद्यार्थ्यांचा अन् पर्यायाने महाविद्यालयाचा विकास हेच आपणासर्वांचे लक्ष्य राहणार आहे. विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. याचे भान ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी,गुणवत्तेचा दर्जा राखण्यासाठी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, संस्थेचे सर्व पदाधिकारी, कटीबध्द आहेत. अभ्यास हे एकच उद्दीष्ट डोळ्यासमोर असू द्या. या ज्ञान मंदीराचे वातावरण तुमच्या सहवासाने फुलवू द्या. तुम्हा सर्वांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छांसह आपले पुनश्च एकदा स्वागत ....!

**प्राचार्य**

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अनिल त्रिंबकदासजी पटेल | अध्यक्ष |
| २) | श्री.सुभाष त्रिंबकदासजी पटेल | उपाध्यक्ष |
| ३) | डॉ.रंजना महेंद्र पाटीदार | सचिव |
| ४) | श्री.निमेश अनिल पटेल | सदस्य |
| ५) | प्र.प्राचार्य डॉ.गणेश रमेशराव शिंदे | सदस्य |
| ६) | डॉ.शिवाजी लक्ष्मण जाधव | सदस्य |
| ७) | डॉ.रामेश्वर भाऊसाहेब म्हस्के | सदस्य |
| ८) | श्री.किरण रमेश जाधव | सदस्य |

## प्राध्यापक वृंद

### कला विभाग

| | |
|---|---|
| १) डॉ.गणेश शिंदे<br>प्र.प्राचार्य | मराठी विभाग |
| २) डॉ.रामेश्वर वाघचौरे<br>उपप्राचार्य | राज्यशास्त्र विभाग |
| ३) डॉ.स्वप्निल गिरगे<br>IQAC Cordinator | अर्थशास्त्र विभाग |
| ४) प्रा.गणेश इंगळे | हिंदी विभाग |
| ५) डॉ.भाऊसाहेब झिरपे | लोकप्रशासन विभाग |
| ६) डॉ.रामेश्वर म्हस्के | इतिहास विभाग |
| ७) डॉ.लहू घोरपडे | इंग्रजी विभाग |
| ८) डॉ.एकनाथ शिंदे | मराठी विभाग |
| ९) प्रा.सिमा राऊत | हिंदी विभाग |
| १०) डॉ.विष्णू शेवाळे | इंग्रजी विभाग |

### विज्ञान विभाग

| | |
|---|---|
| १) डॉ.शिवाजी जाधव | रसायनशास्त्र |
| २) प्रा.सुनिता पाठक | वनस्पतीशास्त्र |
| ३) डॉ.कविशा पाटीदार | सुक्ष्म जीवशास्त्र |
| ४) प्रा.रामदास मदन | गणित |
| ५) डॉ.शंकर नरवडे | रसायनशास्त्र |
| ६) डॉ.महेश साळुंके | सुक्ष्म जीवशास्त्र |
| ७) प्रा.प्रियंका पाटील | पदार्थ विज्ञान |
| ८) प्रा.महादेव ढेरे | गणित |

## कार्यालयीन कर्मचारी वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्रीमती कल्पना बडोदे | ग्रंथपाल | २) श्री.सोमनाथ टाक | शा.शि.निदेशक |
| ३) श्री.किरण जाधव | व.लिपिक | ४) श्री.निलेश सनवे | क.लिपिक |
| ५) श्रीमती कविता मुळे | प्रयोगशाळा सहा. | ६) श्रीमती संजीवनी बनसोडे | शिपाई |

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) महाविद्यालयात भरलेली फीस कोणत्याही कारणास्तव परत दिली जाणार नाही.

२) डुप्लीकेट टी.सी. (दुसरी प्रत) च्या आधारावर प्रवेश दिला जाणार नाही.

३) कार्यालयात सादर केलेली मुळ कागदपत्रे कोणत्याही सबबीवर परत दिली जाणार नाहीत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्राच्या प्रमाणित प्रती जवळ ठेवाव्यात.

४) टी.सी.वर खाडाखोड करणे दखलपात्र गुन्हा असून त्याबद्दल प्रवेश रद्द केला जातो.

५) योग्य कारणाशिवाय डुप्लीकेट टी.सी. दिला जाणार नाही.

६) प्रत्येक विषयाच्या जागा मर्यादित असल्यामुळे प्रथम येणाऱ्यास व मेरीटनुसार प्राधान्य दिले जाईल.

७) प्रथम वर्षासाठी निवडलेल्या विषयांचीच निवड द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी करावी लागेल, त्यात कुठलाही बदल करता येणार नाही.

## उपस्थिती संबंधी सूचना

१) प्रत्येक नियमित तासाला विद्यार्थ्यांची उपस्थिती घेतली जाते.

२) विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.

३) प्रत्येक महिन्यात ७५% पेक्षा कमी उपस्थिती असल्यास पालकांना कळविले जाईल व परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

## परीक्षेसंबंधी सूचना

१) महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या सत्र / पूर्व वार्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे.

२) परीक्षेस अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्याला दंड आकारला जाईल.

३) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याचा गौरव करण्यात येईल व पारितोषिक दिले जाईल.

## वरिष्ठ महाविद्यालयीन प्रवेशासाठी पात्रता

कला व विज्ञान शाखेत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गासाठी प्रवेश घेण्याकरीता ठराविक नमुन्यातील अर्ज पूर्ण भरुन तो प्रवेश समितीच्या सह्या घेऊन कार्यालयात सादर करावा. कला, सामाजिक शास्त्र यांचा अभ्यासक्रम मराठी माध्यमातून असून, विज्ञान शाखेकरीता इंग्रजी माध्यम आहे. अर्जासोबत मूळ प्रमाणपत्रे प्रत्येकी २ प्रमाणित प्रतींसह सादर करावेत.

१) १० वी गुणपत्रक झेरॉक्स २ प्रती. (प्रथम वर्षासाठी)

२) मागील वर्ग उत्तीर्ण झालेली मूळ गुणपत्रिका + झेरॉक्स २ प्रती.

३) महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (टी.सी.) + झेरॉक्स २ प्रती.

४) अनुसूचित जाती / जमातीचा दाखला. (फक्त वर्गीकृत जमातींसाठी)

५) उत्पन्नाचा दाखला तहसीलदार.

६) प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ पात्रता अर्ज.

७) इतर विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्थलांतराचा दाखला.

८) पालकाचे हमीपत्र. ९) ऑनलाईन एम.के.सी.एल.प्रवेश अर्ज छापील प्रत.

१०) मोबाईल नंबर आधार व बँक खात्याला लिंक असणे आवश्यक आहे. ११) ईमेल आयडी.

## अभ्यासक्रम

### अनिवार्य पर्यावरण शास्त्र व संगणकशास्त्र अभ्यासक्रम

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सन २००४-२००५ पासून पर्यावरण शास्त्र हा विषय कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांना अनिवार्य केलेला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने पदवीच्या द्वितीय वर्षात करावयाचा आहे. या अभ्यासक्रमासाठी रुपये १००/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. हे शुल्क भरणे विद्यार्थ्यास अनिवार्य आहे. तसेच २००५-०६ पसून १०० तासांचा संगणकशास्त्र अभ्यासक्रम सुध्दा अनिवार्य केलेला आहे. सदरील अभ्यासक्रम विद्यार्थ्याने पदवीच्या प्रथम वर्षात पूर्ण करावयाचा आहे. त्यासाठी रुपये १००/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. महाराष्ट्र शासनाचा (MS-CIT) अभ्यासक्रम अथवा बारावी विज्ञान शाखेमध्ये ज्यांनी संगणकशास्त्राचा अभ्यासक्रम (I.T.) पूर्ण केलेला असल्यास त्यांना प्रथम वर्षास असलेला संगणकशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करण्याची आवश्यकता नाही, परंतु तशा संदर्भाचे प्रमाणपत्र त्यांनी प्रथमवर्षाच्या प्रवेशाच्या वेळी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. सन २०२१-२२ पासून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधान हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे. या विषयाची परीक्षा द्वितीय सत्रात देणे आवश्यक आहे.

## उपस्थिती व शिस्त नियम

महाविद्यालयात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने खालील नियमांचे पालन काटेकोरपणे केले पाहिजे.

१) विद्यार्थ्याने किमान ७५% उपस्थिती पूर्ण न केल्यास त्यास परीक्षेस बसता येणार नाही.

२) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून ४० गुणांची सत्र परीक्षा असेल व १० गुणांची अंतर्गत प्रात्यक्षिक परीक्षा असेल.

३) अंतर्गत परीक्षेस गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

४) महाविद्यालयीन परीसरात सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करणे अनिवार्य आहे. जे विद्यार्थी गैरवर्तन करताना आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करुन त्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

५) प्रत्येकांनी महाविद्यालयाची शुल्क पावती शुल्क भरतेवेळेस सोबत आणावी.

६) ग्रंथालयाची पुस्तके, प्रयोगशाळेतील साहित्य व महाविद्यालयीन फर्निचर काळजीपूर्वक वापरणे. नासधूस करणाऱ्यास दंड आकारला जाईल.

७) महाविद्यालयात धुम्रपान, तंबाखू, पान, गुटखा इ. वापरणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

८) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात येतांना ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य असेल.

९) महाविद्यालय तासिकांना भ्रमणध्वनी (मोबाईल) वापरण्यास बंदी आहे.

## ग्रंथालयाचे नियम

१) ग्रंथालयातून पुस्तक घेतेवेळी ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.

२) एकावेळी दोनच पुस्तके देण्यात येईल व पुस्तक ठेवण्याचा अवधी ७ दिवसांचा राहील.

३) सर्व पुस्तके वार्षिक परीक्षेपूर्वी परत करावी लागतील. पुस्तके उशिरा परत केल्यास २ रु. प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.

४) पुस्तक हरवल्यास, पुस्तकाची पाने फाटल्यास, त्यावर मजकूर लिहिल्यास तसेच पुस्तक खराब केल्यास पुस्तकाच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम भरावी लागेल.

# वरिष्ठ महाविद्यालय

## कला विभाग :

### बी.ए.प्रथम वर्ष :

अ) अनिवार्य विषय :- १) इंग्रजी २) द्वितीय भाषा - मराठी / हिंदी ३) अनिवार्य संगणकशास्त्र
४) अनिवार्य भारतीय संविधान

ब) ऐच्छिक विषय :- खालील पैकी ३ विषय ऐच्छिक विषय म्हणून निवडता येतील.
१) मराठी / इंग्रजी / हिंदी २) इतिहास ३) लोकप्रशासन ४) अर्थशास्त्र
५) राज्यशास्त्र

प्रत्येक गटातून एका पेक्षा जास्त विषय विद्यार्थ्यास निवडता येणार नाही.

टीप : विद्यापीठाकडून एनइपी नुसार नवीन विषय प्रत्यक्ष प्रवेशावेळी स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

### बी.ए. द्वितीय वर्ष :

अ) अनिवार्य विषय : १) इंग्रजी २) द्वितीय भाषा - मराठी / हिंदी. ३) अनिवार्य पर्यावरणशास्त्र

ब) ऐच्छिक विषय : प्रथम वर्षासाठी निवडलेलेच विषय असतील.

### बी.ए. तृतीय वर्ष :

अ) द्वितीय वर्षासाठी निवडलेले ऐच्छिक विषय तृतीय वर्षासाठी राहतील. त्यापैकी एक मुख्य विषय व दोन गौण विषय घेता येतील.

## विज्ञान विभाग :

### बी.एस्सी. प्रथम वर्ष :

अ) अनिवार्य विषय :- १) इंग्रजी २) द्वितीय भाषा - मराठी / हिंदी ३) अनिवार्य संगणकशास्त्र
४) अनिवार्य भारतीय संविधान

ब) ऐच्छिक विषय :- खालील पैकी कोणत्याही एका गटाची निवड करावी लागेल.

| | | |
|---|---|---|
| १) भौतिकशास्त्र (Physics) | रसायनशास्त्र (Chem) | गणित (Math) |
| २) रसायनशास्त्र (Chem) | वनस्पतीशास्त्र (Botany) | प्राणीशास्त्र (Zoology) |
| ३) रसायनशास्त्र (Chem) | सुक्ष्मजीवशास्त्र (Micro Bio) | प्राणीशास्त्र (Zoology) |
| ४) रसायनशास्त्र (Chem) | सुक्ष्मजीवशास्त्र (Micro Bio) | वनस्पतीशास्त्र (Botany) |

टीप : विद्यापीठाकडून एनइपी नुसार नवीन विषय प्रत्यक्ष प्रवेशावेळी स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

### बी.एस्सी. द्वितीय वर्ष :

अ) अनिवार्य विषय : १) इंग्रजी २) द्वितीय भाषा - मराठी / हिंदी. ३) अनिवार्य पर्यावरणशास्त्र

ब) ऐच्छिक विषय : प्रथम वर्षासाठी निवडलेलेच विषय असतील.

### बी.एस्सी. तृतीय वर्ष :

अ) द्वितीय वर्षासाठी निवडलेले ऐच्छिक विषय तृतीय वर्षासाठी राहतील.

*** सूचना :** विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्रास मंजुरी मिळेपर्यंत सर्व प्रवेश अस्थायी समजण्यात येतील. विज्ञान प्रथम वर्षासाठी (१) ची निवड करतेवेळी त्या विद्यार्थ्यास बारावी वर्गात हा विषय असणे अनिवार्य आहे.

# वरिष्ठ महाविद्यालयीन शुल्क

प्रवेश घेतेवेळेस खालीलप्रमाणे फी भरावी लागेल.

| अ.क्र. | विवरण | प्रथम वर्ष (रु.) | द्वितीय वर्ष (रु.) | तृतीय वर्ष (रु.) |
|---|---|---|---|---|
| १) | नोंदणी शुल्क | २५ | २५ | २५ |
| २) | प्रवेश शुल्क | २५ | २५ | २५ |
| ३) | अध्ययन शुल्क कला | १७६० | १७६० | १७६० |
| | अध्ययन शुल्क विज्ञान | २२०० | २२०० | २२०० |
| ४) | विद्यापीठ पात्रता शुल्क (मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांसाठी) | ५० | -- | -- |
| ५) | ग्रंथालय व वाचनालय फी | ५० | ५० | ५० |
| ६) | क्रीडा शुल्क | ५० | ५० | ५० |
| ७) | नियतकालिक | ५० | ५० | ५० |
| ८) | विद्यार्थी संसद (व्यासपीठ) | १० | १० | १० |
| ९) | ओळखपत्र | १० | १० | १० |
| १०) | महाविद्यालयीन विकासनिधी | १०० | १०० | १०० |
| ११) | युवक महोत्सव | ५० | ५० | ५० |
| १२) | महाविद्यालयीन परीक्षा फी | ७५ | ७५ | ७५ |
| १३) | विद्यार्थी मदत निधी | १० | १० | १० |
| १४) | प्रयोगशाळा फी (फक्त विज्ञान विभाग) | ३३०० | ३३०० | ३३०० |
| १५) | ग्रंथालय अनामत | ५० | -- | -- |
| १६) | प्रयोगशाळा अनामत (फक्त विज्ञान विभाग) | १०० | -- | -- |
| १७) | टी.सी. फी (महाविद्यालय)(MKCL T.C. 50/-) | १०० | १०० | १०० |
| १८) | टी.सी. फी (दुसरी प्रत) | ३०० | ३०० | ३०० |
| १९) | बोनाफाईड प्रमाणपत्र | १० | १० | १० |
| २०) | रेकॉर्ड बुक (प्रत्येकी ८५ रु.) | ५१० | ५१० | ५१० |
| २१) | पर्यावरणशास्त्र (अनिवार्य) | -- | १०० | -- |
| २२) | अनिवार्य संगणकशास्त्र | १०० | -- | -- |
| २३) | स्नेहसंम्मेलन फी | ५० | ५० | ५० |
| २४) | वैद्यकीय | १५ | १५ | १५ |
| २५) | महाविद्यालय शुल्क / विद्यापीठ शुल्क | १० | १० | १० |
| २६) | विद्यार्थी कल्याण फी | २० | २० | २० |

अनामत रक्कम टी.सी. काढतेवेळी पावती दाखविल्यास मिळू शकेल. नवीन प्रवेशार्थी विद्यार्थ्यास एक वेळ अनामत रक्कम भरावी लागेल.

# विद्यापीठ नियमानुसार आकारण्यात येणारा शुल्क

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ई सुविधा | ५० | ५० | ५० |
| २८) | इंद्रधनुष्य शुल्क | ०४ | ०४ | ०४ |
| २९) | अश्वमेघ फी | ०४ | ०४ | ०४ |
| ३०) | अभियान शुल्क | ०४ | ०४ | ०४ |
| ३१) | आपत्कालीन निधी | २० | २० | २० |
| ३२) | अविष्कार निधी | ०४ | ०४ | ०४ |
| ३३) | राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | १० | १० | १० |
| ३४) | आव्हान शुल्क | ०४ | ०४ | ०४ |
| ३५) | कमवा व शिका योजना | १० | १० | १० |
| ३६) | ट्युटोरिअल बुक (प्रत्येकी २५ रुपये) | २०० | २०० | २०० |

**टीप :** विद्यापीठाच्या व शासकीय नियमानुसार ई–सुविधा फीस रु. ५० देणे आवश्यक आहे. मराठवाडा विभागाबाहेरील, महाराष्ट्राबाहेरील व देशाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ पात्रता शुल्क अनुक्रमे १०० रु., ५०० रु.व १२,५०० रु. आहे.

वरील फीसमध्ये शासनाकडून अथवा विद्यापीठाकडून शुल्क वाढ झाल्यास त्यानुसार वाढीव शुल्क देणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

## शिष्यवृत्ती व शुल्क माफीसाठी अट

१) एकावेळेस एकापेक्षा अधिक सवलतींचा फायदा घेता येणार नाही.
२) वर्गात नियमित उपस्थिती किमान ७५ % अनिवार्य आहे.
३) योग्य कारणाशिवाय विद्यार्थी गैरहजर राहिल्यास सवलती रद्द केल्या जातील.
४) महाविद्यालयात वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षेस घटक चाचणीस विद्यार्थी हजर असला पाहिजे.

## ई.बी.सी. सवलत

१) ई.बी.सी. सवलतीसाठी विहित नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत.
२) सक्षम अधिकाऱ्याचा सन २०२४–२५ चे उत्पन्न रु. ८०००००/– पेक्षा कमी असल्याचा दाखला.
३) वडील हयात नसतील तर त्यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र व आईच्या नावावर उत्पन्नाचा दाखला.
४) आई–वडील दोघेही हयात नसतील तर दोघांचे मृत्यूचे प्रमाणपत्र व पालकांच्या नावावर उत्पन्नाचा दाखला.
५) पालकांनी द्यावयाचे अपत्य प्रमाणपत्र (ई.बी.सी. सवलत दोन अपत्यापर्यंतच मिळते.)
६) इतर महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी तेथील ई.बी.सी.मंजूरीचे आदेश क्रमांक आणणे आवश्यक आहे.
७) शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट आणावे.
८) ई.बी.सी.नामंजूर झाल्यास परीक्षापूर्वी पूर्ण फी भरावी लागते.
९) ई.बी.सी.सवलत डुप्लिकेट टी.सी.वर मिळणार नाही.

## भारत सरकार शिष्यवृत्ती सवलत

१) अर्ज अचूक व खाडाखोड न करता भरावेत व शिक्षणात खंड असलेल्या विद्यार्थ्यांनी गॅप सर्टिफिकेट जोडावेत.

२) उत्पन्नाचे व जातीचे प्रमाणपत्रे तहसीलदाराने प्रमाणित केलेले असावेत.

३) अर्जासोबत टी.सी., गुणपत्रिका, उत्पन्नाचे व जातीचे प्रमाणपत्र ४ सत्य प्रतींसोबत जोडावे.

४) पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नवीन फार्म तर पदवी द्वितीय व तृतीय वर्षासाठी नुतनीकरण्याचे फार्म भरावेत. ५) एकाच वेळी दोन वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी या सवलती मिळणार नाहीत.

६) एस.सी./एस.टी.विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न रु. २.५० लाख आणि ओ.बी.सी./ डी.टी.(व्ही.जे.)/ एन.टी./एस.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न १.५० लाख पर्यंत असणाऱ्यांनाच या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.

७) डुप्लीकेट टी.सी. असल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही व अशा विद्यार्थ्यांना पूर्ण फिस भरावी लागेल.

८) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात अर्जाची छापील प्रत जमा करणे आवश्यक आहे. स्वत:चा आधार नंबर अपडेट असणे आवश्यक आहे.

## अपंग शिष्यवृत्ती सवलत

१) अपंग विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज भरुन अपंगत्व लक्षात येईल असा फोटो वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र व तहसीलदारांच्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रासह सादर करावेत.

२) मागील वर्षाच्या गुणपत्रिकेत ४०% पेक्षा अधिक गुण व किमान ४०% अपंगत्व असणे जरुरीचे आहे. (ATKT मिळणाऱ्या विद्यार्थ्यांस सवलत मिळणार नाही.)

## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सवलत

जैन, ख्रिश्चन, पारशी, मुस्लीम, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील फॉर्म ऑनलाईन भरुन महाविद्यालयात सादर करावेत.

## ओळखपत्र

१) महाविद्यालयाच्या परिसरात सर्व कामासाठी ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

२) ओळखपत्र हरवल्यास डुप्लिकेट ओळखपत्रासाठी रु. १००/- फीस भरावी लागेल.

## व्यक्तिमत्त्व विकास

व्यक्तिमत्त्व विकासासाठी या महाविद्यालयात खालील उपक्रम राबविले जातात.

१) विविध मान्यवरांचे विषयानुरुप चर्चासत्रांचे आयोजन केले जाते.

२) विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा यासाठी वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

३) विद्यार्थी केंद्र बिंदू मानून त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालय कटिबध्द.

४) राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. तसेच विविध शिबीरांचे आयोजन केले जाते.

## महत्त्वाची सूचना

महाविद्यालयातील फलकावर लावण्यात येणाऱ्या व महाविद्यालयाच्या वेबसाईटवर, टेलिग्राम ग्रुपवर टाकण्यात येणाऱ्या शासकीय, इतर संस्था व विद्यापीठ यांच्याकडून येणाऱ्या सर्व महत्त्वाच्या सूचनांची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी. विद्यार्थ्यांनी टेलिग्राम ग्रुपवर नियमीत ऑनलाईन सूचना पहाव्यात.



उन्नत भारत अभियान योजने अंतर्गत पाचलगाव येथे कुटुंब सर्वेक्षण करताना महाविद्यालयातील विद्यार्थी या प्रसंगी सरपंच श्री.त्रिंबक बोंबले, श्री.बद्रीनाथ बोंबले, डॉ.गणेश शिंदे, गावकरी, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी.

रा.से.यो.च्या वतीने प्रवाह परीवार (अनाथालय) येथे रक्षाबंधन साजरे करताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी याप्रसंगी प्रवाहचे संचालक श्री.रामेश्वर गोर्डे, प्राचार्य डॉ.गणेश शिंदे, प्रा.सुनिता पाठक





मायगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर प्रसंगी गावातील नागरिकांची हिमोग्लोबीन, रक्तगट व आरोग्य तपासणी करताना रासेयोचे प्रशिक्षीत स्वयंसेवक प्रतिक सोलाट, सोबत ग्रा.पं.सदस्य आप्पासाहेब गिरगे, डॉ.स्वप्निल गिरगे, कार्यक्रमाधिकारी प्रा.सुनिता पाठक व गावकरी

एसआरडी/एनआरडी पूर्व तयारी शिबीरात निवड झालेल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी निकीता भावले व वृषाली गायकवाड यांच्या सोबत विद्यापीठाचे प्र.कुलगुरु श्री.शाम शिरसाठ, डॉ.गणेश शिंदे, डॉ.प्रभाकर कुटे व विद्यार्थी





रा.से.यो.शिवीरा दरम्यान मायगाव येथे रक्तदान करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश शिंदे, सरपंच किशोर दसपुते व विद्यार्थी.



रा.से.यो. शिबीरादरम्यान वृक्षारोपण करताना महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी.



रा.से.यो.शिबीरादरम्यान महाविद्यालयाच्या वतीने गावकऱ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन.



रा.से.यो.शिबीरादरम्यान गावकऱ्यांसोबत बालविवाह विषयी जनजागृती करतांनी महाविद्यालयातील विद्यार्थी.

शुभम् कॉम्प्युटर्स,पैठण.९८२२११५२६१